# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट ४०२-२०२४** **दिनांक :- २८/१०/२०२४**

## "Credit card द्वारे ऑनलाईन झालेली ७९,९००/- रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश "

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील मिरारोड परीसरात राहणा-या श्री. सिंग यांना नवीन क्रेडिट कार्ड प्राप्त झाले होते. तक्रारदार यांना अनोळखी मोबाईल धारकाने फोन करुन क्रेडिट कार्ड चालु करण्यासाठी मोबाईल पाठविलेल्या लिंकमध्ये क्रेडिट कार्डाची माहिती भरण्यास सांगितले. तक्रारदार यांनी माहिती भरली असता क्रेडिट कार्डाचे खात्यातुन रक्कम कपात झाल्याचा मॅसेज प्राप्त झाला. तक्रारदार यांनी सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्याने तात्काळ तक्रारी अर्जाची नोंद घेवुन ऑनलाईन **NCCRP Portal** वर तक्रार नोंदविण्यात आली.

तक्रारदार यांची ऑनलाईन **NCCRP Portal** वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बँक खात्यात थांबविण्यात आली. तक्रारदार याची बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळविण्याकरीता संबंधीत बँकसोबत पत्रव्यवहार करण्यात आले. अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी बँकेसोबत पत्रव्यवहार करुन पाठपुरावा केल्याने तक्रारदार यांची **फसवणुक झालेली ७९,९००/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.**

## अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

- **क्रेडीट कार्ड, डेबिट कार्डद्वारे फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**
- **अनोळखी लिंक प्राप्त झाल्यास त्या अनुषंगाने कोणतीही कारवाई करुन नये.**
- **मोबाईलमध्ये कोणतेही अनोळखी ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये, तसेच आपले मोबाईलमधील ॲप्लीकेशनची पडताळणी करावी.**
- **बँकेकडून बँक खातेधारकाला कोणतीही वैयक्तीक माहिती (KYC करीता) विचारली जात नाही.**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.**
- **फसव्या एमएसएसला,कॉल प्रतिसाद देवू नका.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउनि/प्रसाद शेनोळकर, पोअं/विलास खाटीक यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

**----0000----**